## मुंबई उच्च न्यायालयाने कल्याणीनगर मार्गे मेट्रो मार्गाला स्थगिती देण्यासाठीची याचिका पुन्हा एकदा फेटाळली

पुणे, १२ जुलै २०१९: पुणे मेट्रोच्या वनाज ते रामवाडी हा मेट्रो मार्ग राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाने आगा खान पॅलेस समोरून घेऊन जाण्यास मज्जाव केल्याने कल्याणीनगर मार्गे वळवण्यात आला आहे. कल्याणीनगरच्या काही नागरिकांचा याला विरोध करून त्यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने दि. १२.०७.२०१९ रोजी जनहित याचिका नंबर. ६३/२०१९ वर सुनावणी घेऊन ही याचिका फेटाळण्यात आली आहे. याआधी देखील अश्याप्रकारे २ वेळा मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून मेट्रो मार्ग

कल्याणीनगर द्वारे वळविण्यास स्थगितीची मागणी करण्याऱ्या जनहित याचिका दाखल करण्याचे प्रयन्त झाले होते .

परंतु मागील दोन्ही वेळा मुंबई उच्च न्यायालयाने या संदर्भातील जनहित याचिका फेटाळण्यात आली होती .उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे मेट्रो मार्गातील सर्व अडथळे निकाली निघाले असून या मार्गावर वेगाने मेट्रोचे बांधकाम

सुरु करण्यात आले आहे .